महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५६ वे | दिनांक : १२/०९/२०२६ | वार : शनिवार

## मनोज जरांगेंचा मुंबई आंदोलनाचा मार्ग मोकळा; हायकोर्टाचा मोठा निर्णय




**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून सध्या राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे. आपल्या सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नाही, या भूमिकेवर मनोज जरांगे पाटील ठाम असून, अंतरवाली सराटी येथे त्यांचे गेल्या 14 दिवसांपासून आमरण उपोषण सुरू आहे. यावर अद्याप कोणताही ठोस तोडगा न निघाल्यामुळे, 12 तारखेनंतर थेट मुंबईत धडक मारण्याचा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. मनोज जरांगे यांच्या या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर, जरांगे पाटील यांच्या संभाव्य आंदोलनाला आझाद मैदानात परवानगी देऊ नये, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र, या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यापासून रोखता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने त्यांची मुंबईत येण्याची वाट मोकळी केली आहे. मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यास मनाई करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. मागील घटनांचा दाखला देऊन यावेळी त्यांना परवानगी नाकारता येणार नाही, तसेच आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असल्याने त्यात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता मनोज जरांगे पाटील यांचा मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील संभाव्य आंदोलनाला विरोध दर्शवणारी याचिका निलेश डहाणूकर आणि राजेश दळवी यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेद्वारे जरांगे यांना आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी न देण्याची मागणी करण्यात आली होती. मागील आंदोलनावेळी आंदोलकांनी संपूर्ण दक्षिण मुंबईचा ताबा घेतल्याचे चित्र होते आणि त्यावेळी खुद्द उच्च न्यायालयालाच आझाद मैदान रिकामे करण्याचे आदेश द्यावे लागले होते, या परिस्थितीचा दाखला याचिकाकर्त्यांनी न्यायालयासमोर दिला. या याचिकेवर आज मुख्य न्यायमूर्ती महेश त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. सुनावणीअंती, मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यास मनाई करण्याचे आदेश देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे याचिकाकर्त्यांना झटका बसला असून, जरांगे पाटील यांचे पुढील आंदोलन आता मुंबईतच होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

## संभाजीनगरात MPSC विद्यार्थ्यांचा सलग तिसरा एल्गार

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) कारभाराविरोधात आणि पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये रस्त्यावर उतरत 'आक्रोश मोर्चा' काढला आहे. हमखास मैदान ते विभागीय आयुक्त कार्यालय असा हा भव्य मोर्चा धडकणार असून, विद्यार्थ्यांच्या या संतापाला पाठिंबा देण्यासाठी आमदार रोहित पवार हेदेखील मोर्चामध्ये सहभागी झाले आहेत. विद्यार्थ्यांची गर्दी लक्षात घेता शहरात पोलिसांचा अत्यंत तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. MPSC अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षांमधील पेपरफुटी, सातत्याने होणारा नियोजनाचा अभाव आणि गट 'ब' परीक्षेतील गैरप्रकारांची सखोल चौकशी व्हावी, अशा एकूण 12 प्रमुख मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. आयोगाच्या या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असून, या सर्व प्रकारांची नैतिक जबाबदारी स्वीकारून MPSC चे अध्यक्ष आणि सचिव यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी मोर्चेकरी करत आहेत. मोर्चाची व्याप्ती पाहता शहर वाहतूक शाखेने सुरक्षेच्या आणि नियोजनाच्या दृष्टिकोनातून वाहतुकीत मोठे बदल केले आहेत. मोर्चाच्या मार्गावरील अण्णाभाऊ साठे चौक ते विभागीय आयुक्त कार्यालय आणि उद्धवराव पाटील चौक हा मुख्य रस्ता आज वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

## राज्यात ४ दिवस वादळी पावसाचा इशारा; यलो अलर्ट




**पुणे :** सप्टेंबरचा दुसरा आठवडा सुरू झाला असला तरी महाराष्ट्रातून मान्सूनच्या परतीचे संकेत अद्याप स्पष्ट झालेले नाहीत. उलट, राज्यातील अनेक भागांत पुढील चार दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाचा अंदाज व्यक्त केला आहे. काही जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला असून, मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगरसह अनेक भागांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. देशातील मान्सूनच्या स्थितीवर नजर टाकली असता यंदा मान्सूनचा परतीचा प्रवास लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. साधारणपणे सप्टेंबरच्या मध्यापासून देशाच्या उत्तर-पश्चिम भागातून मान्सूनच्या परतीला सुरुवात होते. मात्र, सध्या वातावरणातील बदल आणि विविध हवामान प्रणालींमुळे अनेक राज्यांमध्ये पावसाला पोषक स्थिती कायम आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही पुढील काही दिवस पावसाचा मुक्काम कायम राहण्याची शक्यता आहे. ११ सप्टेंबरला या जिल्ह्यांना यलो अलर्ट हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ११ सप्टेंबर रोजी नाशिक घाट परिसर, परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांत स्थानिक पातळीवर पावसाचा जोर वाढू शकतो. १२ सप्टेंबरला राज्याच्या मोठ्या भागात पावसाची शक्यता १२ सप्टेंबर रोजी पावसाचा प्रभाव आणखी व्यापक होण्याचा अंदाज आहे. धुळे, नाशिक घाट, नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस होण्याची शक्यता आहे. या काळात काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाच्या सरी कोसळू शकतात. त्यामुळे नागरिकांनी स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. १३ सप्टेंबरला मुंबई-पुण्यासह अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट १३ सप्टेंबर रोजी कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक भागांत पावसाची शक्यता आहे. विशेष म्हणजे मुंबई आणि पुण्यासह अनेक महत्त्वाच्या शहरांना या दिवशी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा घाट, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. मुंबई महानगर परिसरात पावसाच्या सरींसह काही ठिकाणी वादळी वारे आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. पुणे आणि घाट परिसरातही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ सप्टेंबर २०२६


## जळगावच्या इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'प्रॉफेट फॉर ऑल' मोहिमेअंतर्गत सुलेखन कार्यशाळा



**जळगाव :** इकरा एज्युकेशन सोसायटी संचालित इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जळगाव येथे देशभरात राबवल्या जाणाऱ्या 'Prophet For All' या मोहिमेअंतर्गत सुलेखन कलेवर (कॅलिग्राफी) आधारित एका अनोख्या व सुंदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी शाळेचे सुप्रसिद्ध सुलेखनकार व उर्दू शिक्षक अन्सारी शफीक यांनी आपल्या कला कौशल्याचे दर्शन घडवत पैगंबर हजरत मोहम्मद मुस्तफा ﷺ यांचे शुभनाम १५ वेगवेगळ्या व आकर्षक कॅलिग्राफीच्या शैलीत साकारले.अन्सारी शफीक यांनी तयार केलेल्या या सुंदर कॅलिग्राफी चार्ट्समध्ये इकरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलतेचा परिचय देत विविध रंग भरले, ज्यामुळे हे कलाकृती अधिकच नयनरम्य बनल्या. विद्यार्थ्यांमध्ये सुलेखन कला, उर्दू भाषा आणि सांस्कृतिक वारशाबद्दल आवड निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.या मनमोहक कॅलिग्राफी चार्ट्सचे अनावरण महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबईचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. हुसेन अख्तर आणि सीईओ सय्यद शोएब हाश्मी यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी आसिफ शाह यांचीही विशेष उपस्थिती होती.इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार यांनी अन्सारी शफीक यांच्या कॅलिग्राफी कलेचे कौतुक करत त्यांच्या कलात्मक सेवेची मनापासून प्रशंसा केली.ते म्हणाले की,"विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच ललित कला आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेशी जोडणारे असे उपक्रम त्यांच्या सर्वसमावेशक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात."उल्लेखनीय आहे की, अन्सारी शफीक हे गेल्या २४ वर्षांपासून इकरा पब्लिक स्कूलमध्ये उर्दू अध्यापनाचे कार्य करत आहेत.या काळात त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना उर्दू भाषेसोबतच सुलेखन कलेचेही प्रशिक्षण दिले आहे. 'Prophet For All' मोहिमेअंतर्गत त्यांची ही धडपड श्रद्धा, कला आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा एक सुंदर संगम ठरली आहे.

## जि. प. प्रशाला अंधानेर येथे गणित कक्ष चे उदघाट्न



**कन्नड (अरुण थोरात) :** गणितासारखा क्लिष्ट अवघड वाटणारा विषय सोपा व्हावा यासाठी गणित लॅब मधील शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना आकृष्ट करणारे आणि मनोरंजक असल्याने विषय अधिक सोपा होईल पत्रकार स्व. सुरेश केवट यांच्या पुण्य स्मरणार्थ शाळेत गणित लॅब ची उभारणी हा अत्यंत चांगला उपक्रम राबविला असल्याचे मत माजी सभापती तथा सरपंच अशोकराव दाबके यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद प्रशाला अंधानेर ता. कन्नड येथे शुक्रवार दि. 11 सप्टेंबर रोजी गणित कक्ष (मॅथ लॅब ) चे माजी सरपंच अशोकरावं दाबके यांच्या हस्ते उदघाट्न करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. पत्रकार स्व. सुरेश केवट यांच्या आठव्या पुण्यस्मरणार्थ इयत्ता सदर गणित कक्ष उभारण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजीव जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापण समितीचे उवध्यक्ष वहिदोद्दीन शेख, तंटा मुक्ती अध्यक्ष संजय पांडे, माजी अध्यक्ष गोरखभाऊ करवंदे यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक राजीव जाधव म्हणाले की अशा गणित प्रयोग शाळेमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील क्लिष्ट प्रमेय सिद्धांत हे प्रत्यक्ष कृतिद्वारे स्वतः पडताळून पाहता येतात गणिता सारखा रुक्ष वाटणाऱ्या विषयात गोडी निर्माण होते. तर माजी सरपंच तथा प्रशासक अशोकराव दाबके म्हणाले की स्व. सुरेश केवट यांनी पत्रकारितेतुन अनेक सामाजिक समस्या सोडविल्या.आज त्यांच्या पुण्यस्मरण निमित्त त्यांच्या कामास पुढे नेण्यात येत आहे हेच खरे अभिवादन आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिपक सोनवणे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक राजीव जाधव यांनी मानले यावेळी प्रशालेचे शिक्षक नारायण दांगट, मछिंन्द्र डिघोळे, सतीश कापुरे, रामभाऊ गुढेकर, सुयश अहिरराव, जावेद पटेल, परिचर शेख अष्पाक यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## जिंतूर येथे श्री गणेशोत्सव २०२६ अनुषंगाने तालुकास्तरीय शांतता समिती बैठक संपन्न; DJ बंदीचा ठराव संमत




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** जिंतूर पोलीस प्रशासनाच्या वतीने श्री गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर आज लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, जिंतूर येथे तालुकास्तरीय शांतता समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, तसेच शहरातील सर्व गणेश मंडळांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.व्यासपीठावर उपस्थित मान्यवर:यावेळी व्यासपीठावर जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, तहसीलदार, तसेच महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य संघटन प्रमुख मा. श्री प्रदीप कोकडवार, महेश महाराज जिंतूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.प्रदीप कोकडवार यांची मागणी - जिंतूरमध्ये DJ पूर्ण बंद करा:यावेळी बोलताना मा. श्री प्रदीप कोकडवार यांनी सांगितले की, "जिंतूर नगरीत गणेशोत्सव शांततेत व भक्तिमय वातावरणात पार पडला पाहिजे. यासाठी जिंतूर शहरात DJ पूर्णपणे बंद झाला पाहिजे असा ठराव मी मांडत आहे. या ठरावाला सर्व नागरिकांचा पाठिंबा आहे."पुढे ते म्हणाले की, जिंतूर शहरात १७ ते १८ गणेश मंडळांना परवानगी दिली जाते, मात्र प्रत्यक्षात १० ते १२ मंडळेच सक्रिय असतात. शांतता समिती बैठकीला मंडळांची उपस्थिती कमी असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.पोलीस प्रशासनाचे आवाहन:यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की, गणेशोत्सव हा फक्त एका भागाचा नसून संपूर्ण भारतात हजारो वर्षांपासून साजरा केला जाणारा सण आहे. त्यामुळे हा उत्सव शांततेत, सौहार्दात, कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. मंडळांनी वेळेत परवानगी घ्यावी, नियमांचे पालन करावे व ध्वनी प्रदूषण टाळावे असे आवाहन करण्यात आले.या बैठकीला जिंतूर शहरातील शेकडो नागरिक, गणेश भक्त व व्यापारी बांधव उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ सप्टेंबर २०२६


## मराठवाड्याचा पाच लाख हेक्टर सिंचन अनुशेष भरून काढण्याची मागणी



**कन्नड (अरुण थोरात) :** मराठवाड्यातील सिंचनाचा पाच लाख हेक्टरचा अनुशेष भरून काढण्यासाठी मंजूर असलेले पाणी तात्काळ उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. याबाबत राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व जलसंपदामंत्र्यांना यापूर्वीही निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, १४ सप्टेंबरपर्यंत ठोस कार्यवाही न झाल्यास १५ सप्टेंबरपासून जिल्ह्यातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीने घेतला आहे.मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व हिंगोली या दुष्काळप्रवण जिल्ह्यांसाठी नार-पार—गोदावरी नदीजोड योजनेतून समुद्रात वाहून जाणारे पश्चिमवाहिनी नद्यांचे ८० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही २०१०-११ पासून सुरू आहे. तसेच कोकणातील उल्हास व वैतरणा खोऱ्यातील समुद्राला वाहून जाणारे ६० टीएमसी पाणी मराठवाड्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे. या दोन्ही योजनांचे आराखडे तयार असून, कामांना प्रशासकीय मान्यताही मिळालेली आहे. मात्र, आजपर्यंत बैठका व आश्वासनांव्यतिरिक्त प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नसल्याने मंजूर १४० टीएमसी पाणी तात्काळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी समितीने केली आहे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड व वैजापूर तालुक्यांतील तापी खोऱ्यातील गुजरदरी, राजुखोरा, कोठी दुधमाळ, सायगव्हाण (सिताखोरी) व वाकला (हत्ती घोडा) या साठवण तलावांना २०१० सालीच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळालेले आहे. या धरणांसाठी १०.०२ दशलक्ष घनमीटर पाणी मंजूर असतानाही विविध कारणे व त्रुटींचे कारण पुढे करून हे प्रकल्प मागील १६ ते १७ वर्षांपासून रखडले आहेत. त्यामुळे संबंधित साठवण तलावांचे प्रकल्प विनाविलंब पूर्ण करून मंजूर पाण्याचा वापर करावा, अशी मागणी ही करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघर्ष समिती तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब शिंदे, समिती सदस्य तथा माजी उपनगराध्यक्ष डॉ.सदाशिव पाटील, वैजापूरचे दत्तात्रय पाटील, अंधानेरचे सरपंच अशोक दाबके, प्रकाश आहेर, खुलताबादचे बाबासाहेब दांडगे, वैजापूरचे हरीसिंग चौधरी आदी पाठपुरावा करत आहेत.

## १५० वर्षांची परंपरा; पावसाची तमा न बाळगता भाविकांकडून नवसपूर्ती



**दौलताबाद (जावेद अहमद) :** येथील ग्रामदैवत माता लक्ष्मीआईची पारंपरिक बारा गाड्यांची यात्रा पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी दि. ११ शुक्रवारी सकाळी ११ ३० वाजता मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली.सुमारे १५० वर्षांची परंपरा असलेल्या या यात्रेत पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.सकाळपासूनच नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी झाली होती. कडक उन्ह असतानाही भाविकांनी त्याची तमा न बाळगता नवसपूर्तीसाठी सहभाग घेतला. काही भाविकांनी गळ टोचून आपला नवस फेडला. सुमारे ३०० ते ४०० भाविकांनी गळ ओढून नवसपूर्ती केली.सकाळी सुमारास माता लक्ष्मीआईची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर गावातील बाहेरील येशीजवळ बारा गाड्यांची पूजा करण्यात आली. भगवान मारुतीचे पूजन व माता लक्ष्मीआइचे पूजन झाल्यानंतर नवसाच्या गळाने बारा गाड्यांना सुरुवात झाली. नवसाच्या गळानेच गळ ओढण्याची सुरुवात करण्याची परंपरा आजही कायम आहे.माता लक्ष्मीआई आपल्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक नवस फेडण्यासाठी यात्रेत सहभागी होतात. यात्रेनिमित्त माळीवाड्यातील प्रत्येक घरात गोडधोड पदार्थ तयार करण्याची परंपराही जपली जाते.यात्रा यशस्वी करण्यासाठी सुनील मुळे, कडू किर्तीकर, धम्मपाल गायकवाड, नितीन वानखेडे, गणेश आस्वार, रामेश्वर बाभळे, पोलीस पाटील प्रमोद साठे, सुभाष मुळे, गोरख हेकडे, संजय वावरे, शिवाजी मुळे, पल्हाड मामा, सुधाकर बबन हेकडे, गाजरेमामा, अशोक साठे, रामनाथ हेकडे, संदीप भगत, बैजिनाथ हेकडे, गणेश मुळे बाळू महाराज, बनसोडे,, गंगाधर मुळे, छबू पेहरकर यांच्यासह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले

## जे. ई. एस. महाविद्यालय जालन्यात, स्व. माणिकराव अग्निहोत्री यांच्या स्मृती भव्य रक्तदान शिबिर



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे शेठ चुनीलालजी गोयल सभागृहात दि.११ सप्टेंबर २०२६ रोजी स्वर्गीय माणिकराव शंकरराव अग्निहोत्री (सेवलीकर) यांच्या स्मृतीपित्त्यर्थ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे व आधार ब्लड बँकेच्या सौजन्याने,भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, जगातील श्रेष्ठ दान ही रक्तदान आहे. यामुळे आपण गरजूंचे प्राण वाचू शकतो माणसाने जीवनामध्ये रक्तदान करत राहावे. असेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.यावेळी सर्वप्रथम रक्तदान महिलांमधून प्रा .डॉ. मिताली बगडिया यांनी तर पुरुषामधून प्रा. शिवनारायण ताठे यांनी केले. या शिबिरामध्ये 40 रक्तदात्यांनी रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी आधार ब्लड बँकेचे श्री गणेश चौधरी, प्रा. समाधान पवार, श्री. साईनाथ एनावार, श्री. राधाकिशन शिरसागर, श्री. सचिन जाधव यांनी विशेष परिश्रम घेतलेत. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड, उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले,राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे, माजी सिनेट सदस्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मीकांत शिंदे, प्रा. वैभव अंबरवाडीकर, प्रा. किशोर तापडिया, एनसीसी अधिकारी डॉ.फुलचंद मोहिते, पर्यवेक्षक ज्ञानेश्वर धनवे,क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. यशवंत सोनवणे, प्रा. डॉ.भाग्यश्री बियाणी, डॉ. यास्मिन शेख, आधी उपस्थित होते.

## जिंतूर तहसीलवर मुख्यमंत्री लाडकी बहिणींचा आक्रोश मोर्चा



**जिंतुर (बि. डी. रामपूरकर) :** जिंतूर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील 1500 रुपये अनुदान काही लाभार्थी महिलांना मिळणे बंद झाल्याने जिंतूर शहरातील व ग्रामीण भागातील महिलांना मध्ये असंतोष निर्माण झाला आहे.मतांचा झालं काम,आता लाडक्या बहिणींना केलं लांब ?असा सवाल उपस्थित करत माकप व जनवादी महिला संघटने जिंतुरच्या तहसिलदार यांना दिनांक 8 सप्टेंबर 2026 ( मंगळवार) रोजी मोठ्या संख्येने जमा होऊन व घोषणा देऊन संपूर्ण तहसिल परीसर दनाऊन सोडले होते व महाराष्ट्र शासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.लाडकी बहीण योजनेचे बंद झालेले अनुदान पूर्ववत सुरू करावे, या मागणीसाठी निवेदन देऊन त्वरीत अंमलबजावणी करून अनुदान चालू करण्याची मागणी केली आहे. निवेदनात मुख्यमंत्री लाडकी बहीन योजना बंद केलेले अनुदान पूर्ववत सुरू करण्यासाठी वैयक्तिक मागणी पत्र दाखल करून घेण्यात यावे अशीहि मागणी करण्यात आली आहे.या वेळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. माकप चे कॉ अकुशराव बुधंवत, कॉ रामकृष्ण शेरे पाटील, कॉ आकाश खनपटे, कॉ रामेश्वर पौळ इत्यादी कार्यकत्यांनी जिंतूरच्या तहसिलदांना निवेदन दिले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ सप्टेंबर २०२६


## किनगाव राजा येथे बैलपोळा उत्सव उत्साहात साजरा



**किनगाव राजा (महेश मुंडे) :** शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा सण असलेला बैलपोळा उत्सव किनगाव राजा येथे मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गावातील शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजवून त्यांची पूजा केली व कृतज्ञता व्यक्त केली. बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा सण मानला जातो, ज्यामध्ये वर्षभर शेतीकामात साथ देणाऱ्या बैलांचा सन्मान केला जातो.सकाळपासूनच बैलांना अंघोळ घालून रंगीत सजावट, झुली, घंटा आणि विविध अलंकारांनी सजविण्यात आले. गावातील प्रमुख मार्गांवरून बैलांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.यावेळी गावातील मान्यवरांच्या हस्ते बैलांचे पूजन करण्यात आले. शेतकरी बांधवांनी आपल्या बैलांना पुरणपोळी व इतर खाद्यपदार्थांचा नैवेद्य दाखवून त्यांच्या श्रमांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. महिलांनी पारंपरिक रांगोळ्या काढून आणि औक्षण करून उत्सवाची शोभा वाढवली.किनगाव राजा येथील बैलपोळा उत्सवामुळे गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी एकोप्याने सण साजरा करत ग्रामीण संस्कृतीची परंपरा जपली.

## कै. सावित्रीबाई जोशी पुरस्कारासाठी ग्रंथ पाठविण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर :** जीवन विकास ग्रंथालय, १९५, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगरतर्फे मागील २८ वर्षापासून मराठवाड्यातील नवोदित लेखकाच्या पहिल्या साहित्यकृतीसाठी कै. सावित्रीबाई जोशी पुरस्कार देण्यात येतो. रोख रवकम, स्मृतीचिन्ह. गौरवपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. हे पुरस्काराचे २९ वे वर्ष आहे. या पुरस्कारासाठी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत प्रकाशित झालेल्या पहिल्या छापील प्रकाशित साहित्यकृतीचा विचार करण्यात येईल. यासाठी साहित्य प्रकाराची कोणतीही अट नाही. योग्य माहितीसह भरलेल्या प्रवेश पत्रिकेसह ग्रंथाची एक प्रत दिनांक २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत ग्रंथालयात पाठविण्यात यावी. प्रवेशिकेचा नमुना ग्रंथालयात विनामूल्य उपलब्ध आहे. हा पुरस्कार मराठवाड्यातील नवोदित लेखकाच्या पहिल्या साहित्यकृतीसाठीच आहे याची नोंद घ्यावी. मराठवाड्यातील नवोदित लेखकांनी आपले साहित्य पुरस्कारासाठी पाठवावे, असे आवाहन ग्रंथालयाच्या कार्यकारी मंडळातर्फे कार्यवाह डॉ. राजशेखर शं. बालेकर यांनी केले आहे. ग्रंथ पाठविण्याचा पत्ता - कार्यवाह,जीवन विकास ग्रंथालय, १९५, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगर- ४३१००५.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाची जिल्हास्तरीय युवक महोत्सवात बाजी




**जालना (प्रतिनिधी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत नुकत्याच पार पडलेल्या जालना जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सवात येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी शोभा यात्रेत द्वितीय, लोक आदिवासी नृत्य प्रथम, व्यंगचित्र प्रथम, वाद विवाद सांघिक प्रथम, उत्कृष्ट अभिनय पुरुष प्रथम पारितोषिकाने सन्मानितकेले आहे. लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय (परतूर) आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालय (मंठा) यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ सप्टेंबर रोजी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.विविध स्पर्धेचे निकाल खालील प्रमाणे आहेत: 1) शोभायात्रा - द्वितीय (एकुण २७ विद्यार्थ्यांचा सहभाग)विषय- महात्मा फुले जन्म द्विशताब्दी " समतेच्या विचाराचा जागर "2) लोक आदीवासी नृत्य- प्रथम सहभागी विद्यार्थी -तन्मयी शिंदे, गौरी पवार, आदीती एखंडे, नम्रता ठाकूर, अनुष्का वझरकर , निकीता ढेम्पे, गिरीजा टाकळकर, ईश्वरी पुंड, यशराज बायस, बलराज अंभोरे3) व्यंगचित्र - प्रथमविश्वजीत नवले 4) वाद- विवाद - (सांघिक) - प्रथम पल्लवी धनगर व गोवर्धन कान्हेरे 5) मुक अभिनय - द्वितीय विषय - ग्लानिर्भवती6) प्रहसन - तृतीय विषय- नशासहभागी विद्यार्थी-साझिया शेख, रवीना राय, रुपाली रविदास, स्नेहल गोरे, मानशी राय, तेजस्विनी महाजन7) एकांकिका - द्वितीय (आकडा) लेखक -राजकुमार तांगडेसहभागी विद्यार्थी - गिरीजा टाकळकर, बलराज अंभोरे, पल्लवी धनगर, गोवर्धन कान्हेरे, रोहीत स्वामी, यशराज बायस, कृष्णा गवळी, साधना चव्हाण 8) उत्कृष्ट अभिनय पुरुष- प्रथम बलराज अंभोरे (तात्या )7) उत्कृष्ट अभिनय- पुरुष- द्वितीय रोहीत स्वामी (पंढरी) 8) उत्कृष्ट अभिनय-स्त्री - द्वितीयगिरीजा टाकळकर (सावित्रि) 9) उत्कृष्ट दिग्दर्शन -द्वितीय पल्लवी धनगर विविध स्पर्धेत सहभाग1) चित्रकला - विश्वजीत नवले2) भारतीय सुगम गायन- अंजिक्य पवार 3) वक्तृत्व - पल्लवी धनगर4) प्रश्नमंजुषा - मानशी राय, माधव जगताप, साझिया शेख5) रांगोळी - आदीती एखंडेया यशाबद्दल महाविद्यालयाच्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाचे श्री. अरुणजी अग्रवाल, प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, प्राचार्य कविता प्राशर, सांस्कृतिक विभाग समिती प्रमुखप्रा. डॉ. रवींद्र भोरे, प्रा. डाॅ. निशिकांत लोखंडे, प्रा. अभिजीत भुतेकर,प्रा.डाॅ. वैशाली शिरसाठ ,सदस्य प्रा. वर्षा वानखेडे ,सदस्यप्रा.डाॅ.मोहिनी रायबागकरयांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला

## मंचक जगताप यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या अशासकीय सदस्यपदी निवड



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, परभणीच्या अशासकीय सदस्यपदी जिंतूर येथील मंचक कैलासराव जगताप (देशमुख) पुंगळेकर यांची निवड करण्यात आली आहे. परभणीचे जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांच्या स्वाक्षरीने 10 सप्टेंबर रोजी या नियुक्तीचे अधिकृत पत्र जारी करण्यात आले.मंचक जगताप हे मागील 15 वर्षांपासून अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या माध्यमातून जिंतूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी ग्राहकांमध्ये जनजागृती करणे, मार्गदर्शन सत्रे आयोजित करणे, ग्राहकांची होणारी फसवणूक व शोषण थांबवण्यासाठी चर्चासत्रे आणि बैठकांचे आयोजन करणे अशा विविध उपक्रमांद्वारे मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊनच जिल्हाधिकाऱ्यांनी ही नियुक्ती केली आहे.जगताप यांच्या या निवडीबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांताध्यक्ष डॉ. विलास मोरे, जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे, विजय चोरडिया, 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे प्रदेशाध्यक्ष, भागवत चव्हाण, परभणी जिल्हा संघटक सचिन रायपत्रीवार, जिंतूर तालुका अध्यक्ष संदीप माहूरकर, आबासाहेब जाधव यांच्यासह संघटनांचे सर्व सदस्य, मार्गदर्शक आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. जगताप यांच्या या नियुक्तीमुळे जिंतूर तालुका व संपूर्ण परभणी जिल्ह्यातून आनंद व्यक्त केला जात असून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ सप्टेंबर २०२६


## रामभाऊ महाराज



देशगव्हाणच्या सुखना नदीकाठी महादेवाचं एक जुनं मंदिर आहे. दगड आणि काळानं झिजलेलं, पण श्रद्धेनं टिकलेलं. मंदिराच्या बाजूला एक छोटीशी पत्राची खोली. त्या खोलीत चूल, एक ताट, एका कोपऱ्यात टेकवलेली वीणा आणि भिंतीला लावलेला भगवा वारकरी झेंडा. आणि तिथेच राहणारे आमचे रामभाऊ महाराज.रामभाऊ महाराज हे काही जन्माचे महाराज नव्हते. ते आमच्याच गावातले, आमच्याच मातीतले. एका अत्यंत सामान्य कुटुंबातले. घरची परिस्थिती जेमतेम, पोटाची खळगी भरण्यापुरतीच शेती. शिक्षण फार नाही, पण कष्टाला मात्र कधीच नाही म्हणायचे नाहीत.आमच्या काकांकडे भिमराव अप्पाकडे ते अनेक वर्ष सालगडी म्हणून होते. बाजार वाहेगावच्या शिवारात सोनाराचं वावर म्हणून मोठं बागायत क्षेत्र होतं. आजूबाजूला वस्ती नाही, आखाडा नाही. दिवसा देखील तिथे जायला लोक घाबरायचे, इतका निर्जन माळ. पण रामभाऊ तिथे रात्रंदिवस एकटे राहिले. बैल, पाणी, बांध, पाटाचं पाणी - यातच त्यांचे अख्खे तारुण्य गेले. अंगकाठी हडकुळी, सावळा रंग, डोळ्यात एक करारीपणा. स्वभाव वरून कडक, धोतर नेसलेले व अंगात पांढरा शर्ट, डोक्यात टोपी गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर अष्टगंध असा त्यांचा पेहराव होता. डोळ्यात चमक. त्यांचा स्वभाव तापट वाटायचा, पण आतून तितकाच मायाळू. एकदा जीव लावला की आयुष्यभर साथ सोडायचे नाहीत. वाऱ्याच्या वेगाने चालणे, एक पाय गावात आणि एक पाय शेतात असणे, हीच त्यांची ओळख होती.गावात सर्वांशी त्यांचे चांगले संबंध. त्यांचा पुतण्या आणि मी वर्गमित्र असल्याने मी त्यांना लहानपणापासून जवळून पाहिले. आम्ही शाळेत असताना ते शेतातून येताना आवर्जून हाक मारायचे. कधी हातातला लांब ऊस मोडून द्यायचे, कधी खिशातून बोरे काढून द्यायचे. त्या बोरांची गोडी आजही जिभेवर आहे.हळूहळू मुले मोठी झाली, कामाला लागली. संसाराचा गाडा थोडा सावरला, हातपाय थोडे मोकळे झाले. आणि नेमका तिथेच त्यांच्या आयुष्याला एक वेगळी कलाटणी मिळाली. जो माणूस आयुष्यभर शेतात राबला, तो सुखना काठच्या महादेवाकडे वळला. हा बदल कुणी ठरवून केला नव्हता, तो आतूनच घडत गेला.ते घरापासून वेगळे राहू लागले. मंदिराची झाडलोट, साफसफाई, दिवाबत्ती, घंटा वाजवणे हीच त्यांची नित्य दिनचर्या झाली. मंदिराशेजारच्या त्या छोट्याशा खोलीत ते स्वतः चुलीवर भाकरी थापून खाऊ लागले. गरजा अगदी कमी, अपेक्षा तर त्याहून कमी. लोकांनी प्रेमाने जेवायला बोलावले, चहा दिला तर आनंदाने घ्यायचे. मी कधी पन्नास-शंभर रुपये चहापाण्यासाठी दिले तर आधी नको म्हणत हात मागे घ्यायचे, पण मी आग्रह केला की डोळ्यात पाणी आणून, दोन्ही हात जोडून घ्यायचे. त्या घेण्यातही एक निरागस कृतज्ञता असायची.माझे घर मंदिराजवळच. त्यामुळे गावी गेलो की पहिला फेरफटका सुखना नदीवर आणि दुसरा हमखास रामभाऊ महाराजांच्या भेटीला. नदीकाठी फिरताना ते मला असे काही सांगायचे जे कोणत्याही पुस्तकात नाही. अमुक वर्षी पुर कुठपर्यंत आला होता, कुठल्या डोहात किती खोली आहे, वाळूची चोरी कुठे चालते, जुना घाट कसा ढासळला - ही ती माहिती होती जी त्यांनी पायांनी आणि डोळ्यांनी अनुभवली होती. त्यांच्या गोष्टीत नदी जिवंत व्हायची.गेल्या काही वर्षात त्यांनी पंढरपूरची वारी धरली. वारी म्हणजे त्यांच्यासाठी सहल नव्हती, ती एक साधना होती. वारीच्या महिना आधीच गाव सोडायचे. खांद्यावर एक छोटी पिशवी, हातात भगवा झेंडा, पायात साधी चप्पल. गावोगाव चालत दिंडीत सामील व्हायचे. परत आल्यावर ते तासभर वारीच्या गमती-जमती सांगायचे. "लोक वारकऱ्याला किती मान देतात, पाय धुतात, जेवू घालतात, माऊली-माऊली म्हणतात," हे सांगताना त्यांचा करारी चेहरा एखाद्या लहान मुलासारखा खुलून जायचा. त्या आनंदात कसला तरी स्वर्ग होता.गावच्या सप्ताहात त्यांनी वीणा हातात घेतली. टाळ वाजवता वाजवता भजन म्हणू लागले. सुरात गोडवा नव्हता, पण आर्तता होती. लोकांनी त्यांना 'रामभाऊ' ऐवजी 'रामभाऊ महाराज' म्हणायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांना संकोच वाटायचा, "आरं, मी कुठला महाराज," म्हणायचे. नंतर मात्र त्यांनाही ते आवडू लागले. ती पदवी त्यांनी मागून घेतली नव्हती, लोकांनी त्यांच्या निष्ठेपोटी, त्यांच्या निस्वार्थ सेवेपोटी दिली होती.मागच्या महिन्यात भेटले तेव्हा थोडे गळाल्यासारखे वाटले. अंग थोडे झिजले होते. वाटले, थकले असतील, वारीचा शीण असेल. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. मागील आठवड्यात त्यांची पत्नी गेली आणि पाठोपाठ आठवडाभरात रामभाऊ महाराजही गेले. हा निव्वळ योगायोग नाही, हा जन्मोजन्मीच्या सोबतीचा शेवट आहे, असे गावातले म्हातारे लोक हळहळत म्हणाले. एका पाठोपाठ एक, जणू एकमेकांची वाट पाहतच गेले.आज सुखना कोरडी आहे, तिचं पाणी तसंच खळखळतंय. महादेवाचे मंदिर तसेच आहे, घंटाही तशीच आहे. पण मंदिराच्या पायरीवर बसून दूरूनच "आरं भाऊ, कवा आलास? चहा घेशील का?" म्हणणारा तो आपुलकीचा आवाज आता कधीच ऐकू येणार नाही. ती पायरी आता थोडी अधिक रिकामी वाटते.रामभाऊ महाराजांनी मागे कोणतीही संपत्ती, जमीन-जुमला कमावला नाही. पण एक मोठी परंपरा ठेवली - कोणताही गाजावाजा न करता, निस्वार्थपणे सेवा करण्याची परंपरा. आता ती सेवा कोण चालवेल, तो दिवा कोण लावेल, हा प्रश्न आहेच. पण आमच्या गावच्या मातीत अशी माणसे जन्माला येतच असतात. कदाचित उद्या दुसरा एखादा रामभाऊ त्या खोलीत दिवा लावेल, घंटा वाजवेल.रामभाऊ ते रामभाऊ महाराज हा प्रवास केवळ एका व्यक्तीचा नाही, तर कष्टातून भक्तीकडे जाणाऱ्या आमच्या गावच्या आत्म्याचाच प्रवास आहे. तो आमच्या स्मरणात कायम राहील.


**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**
**मो. +91 94040 00398**


## माधवराव पाटील महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर विशेष व्याख्यान संपन्न



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत आणि श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या वतीने शुक्रवारी (ता. ११) रोजी विश्वबंधुत्व दिनानिमित्त स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र संशोधन केंद्र सभागृहात आयोजित या कार्यक्रमात स्वामी विवेकानंद व्यक्ती आणि विचार या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कंटेकूरचे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे, शाळेचे सहशिक्षक जीवन सूर्यवंशी यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर प्रा. डॉ. सतीश शेळके, प्रा. डॉ. राम बजगिरे यांची उपस्थिती होती. विस्तार सेवा केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी आपल्या प्रास्ताविकात विश्वबंधुत्व दिनाचे औचित्य आणि स्वामी विवेकानंदांच्या विचारांची आजच्या काळातील सुसंगतता स्पष्ट केली.चौकट : प्रमुख अतिथी आणि वक्ता म्हणून बोलताना लक्ष्मीकांत पटणे यांनी स्वामी विवेकानंदांच्या तरुण मनातील जिद्द, त्यांचे शिकागो येथील ऐतिहासिक भाषण, राष्ट्रप्रेम आणि विश्वबंधुत्वाचा संदेश यावर प्रकाश टाकला. युवकांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांना आपल्या जीवनात आचरणात आणून देश विकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.चौकट : अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा वैचारिक कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. स्वामींचे विचार तरुणांना योग्य दिशा देणारे ठरतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुजित मटकरी तर आभार प्रा. डॉ. मुकुंद धुळेकर यांनी मानले. या व्याख्यानाला महाविद्यालयातील विविध शाखांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे व विस्तार केंद्राचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कलियुगातील सत्य

माणसाने माणसाला,
सदा मोठेपण द्यावे.
जीवनात जगताना,
स्वतः कमीपणा घ्यावे. १

माझ्या गुरुचे वचन,
सदा करितो जतन.
मोठेपणामुळे तुझे,
सदा होईल पतन. २

नको मला मोठेपणा,
मोठेपणा करी हेवा.
जरा लहान होऊनी,
करा समाजाची सेवा. ३

मोठेपणा नको देवा,
करे माणसाला दूर.
दूर जाताच माणूस,
डोळ्यातून वाहे पूर. ४

कवी नागेश सांगतो,
कलियुगातले सत्य.
जगताना बाळगावे,
अंगी कमीपणा नित्य. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**